

# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक ३२१, शुक्रवार १३ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# नगर-पुणे इंटरसिटी लाईनबाबत कार्यवाही करा

■ खा. नीलेश लंके यांचे रेल्वे अधिकाऱ्यांना निर्देश ■ नगर रेल्वे स्थानकावर आढावा बैठक

नगर : प्रतिनिधी

**नगर-पुणे इंटरसिटी लाईन केवळ मेटनन्स पॉईट नसल्यामुळे मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असून ही लाईन सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश खासदार नीलेश लंके यांनी दिले.**

रेल्वेसंदर्भातील विविध अडचणींसंदर्भात खा. नीलेश लंके यांनी बुधवारी नगर येथील रेल्वे व्यवस्थापक यांच्या दालनामध्ये येथे रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. या बैठकीत बीड-परळी रेल्वे मार्ग इंगणवाडी पर्यंत पुर्ण झाला असून सुमारे ५० ते ६० किलोमिटरचे काम प्रलंबित आहे. या कामाचा आढावा घेण्यात येऊन हे काम तातडीने पुर्ण करण्यासंदर्भात खा. लंके यांनी सुचना दिल्या. हे काम पुर्ण करण्यासाठी तांत्रिक अडचणी असतील तर त्याविषयी अहवाल तयार करून सादर करण्याचेही त्यांनी सुचित केले.

बैठकीत नगर शहर, नगर तालुका, श्रीगोंदे, राहुरी तसेच इतर काही भागामध्ये शेतकऱ्यांना तसेच त्यांच्या शेतीमालाच्या वाहतूकीसंदर्भात रेल्वेशी निगडीत अडचणींवरही यावेळी चर्चा झाली. ओव्हर ब्रिज, रेल्वे क्रॉसिंग, अंडरग्राउंड ब्रिज आदी अडचणींचा आढावा घेण्यात येऊन त्या दूर करण्यासाठी खा. लंके यांनी अधिकाऱ्यांना सुचना दिल्या.

बैठकीमध्ये पुणे विभागाचे वरीष्ठ विभागीय अभियंता देवेंद्रकुमार, दौंड-मनमाड रेल्वे लाईनचे उपअभियंता दिपक कुमार, सहाययक अभियंता एस सुरेश, नगरचे सहाय्यक अभियंता त्रिवेदी, वरिष्ठ शाखा अभियंता अजय चोभे, स्टेशन मास्तर एन. पी.तोमर, मुख्य वाणिज्य निरीक्षक पी.जी. वारे, ट्रॅफीक इन्स्पेक्टर तथा रेल्वे सुरक्षा इन्स्पेक्टर सतपाल सिंग, बेलापुरचे वरिष्ठ शाखा अभियंता विनयकुमार यांनी सहभाग नोंदविला.

बैठकीस घनश्याम शेलार, मा. नगरसेवक योगीराज गाडे, मा. नगरसेवक प्रदीप परदेशी, दत्ता जाधव, सरपंच पोपटराव पुंड, अजय लामखडे, शिवाजी होळकर, सचिन पठारे, बाबा काळे, दत्ता खताळ, रामेश्वर निमसे आदी उपस्थित होते.



■ रेल्वेसंदर्भातील विविध प्रश्नांवर खा. नीलेश लंके यांनी नगर रेल्वे स्थानक येथे अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली.

## कोरोना काळातील पॅसेंजर सुरू ठेवा

**सध्या अमृत भारत योजनेअंतर्गत अनेक ठिकाणी रेल्वेची विकास कामे सुरू आहेत. या कामांची सद्य स्थिती काय आहे, याबाबत या बैठकीत आढावा घेण्यात आला. कोरोना काळामध्ये सुरू करण्यात आलेल्या पॅसेंजर ट्रेन्स या कालवधीनंतरही प्रवाशांसाठी सोईच्या होत्या. त्या सुरू करण्याबाबत प्रवाशांची मागणीही होती. या मागणीचा विचार करून या पॅसेंजर सुरू ठेवण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना खा. लंके यांनी यावेळी दिल्या.**

## देहरे येथील अंतर्गत रस्ता खुला करा

**देहरे येथील ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावांतर्गत रेल्वे लाईनचा रस्ता खुला करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी तसेच राहुरी येथे बांबोरी, सडे रेल्वे स्टेशनला त्या रूटच्या रेल्वे गाडयांना थांबा देण्यात यावा, रेल्वे स्टेशन परिसरात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी तैनात पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त घालण्याच्या सुचनाही खा. लंके यांनी या बैठकीत दिल्या.**

## नगर स्थानकावर थांबा द्या

**नगर स्थानकावर पुणे-लखनऊ, पुणे गोरखपुर व पुण अंजनी या रेल्वे गाडयांना थांबा नाही. या गाडयांना थांबा मिळावा यासाठी पुणे येथील विभागीय व्यवस्थापक यांच्यामार्फत प्रस्ताव तयार करून कार्यवाही करण्यात यावी अशी सुचना लंके यांनी केली.**

## ओव्हर ब्रीजची कामे तातडीने मार्गी लावा

**दौंड ते मनमाड डबल लाईनचे काम प्रगतीपथावर आहे. या मार्गावर बेलवंडी येथे ओव्हर ब्रीज होणे आवष्यक असून तशी मागणी तेथील ग्रामस्थ तसेच शेतकरी वर्गाने केली आहे. या मागणीबाबत कार्यवाही करण्यात यावी या सुचनेवर नगर जिल्हयांतर्गत याच मार्गावर ९ ठिकाणी ओव्हर ब्रीज करण्यासाठी सर्वेक्षणाचे काम सुरू असून लवकरच या कामांना सुरूवात होईल असे यावेळी अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. यापैकी काही कामे सेतूबंधन अंतर्गत करण्यात येणार असून त्याबाबत पाठपुरावा करून ही कामे तातडीने मार्गी लावा असेही खा. लंके यांनी यावेळी सांगितले.**

# तीन रस्त्यांच्या कामासाठी १९ कोटींचा निधी

■ खा. नीलेश लंके यांची माहिती ■ प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून निधी ■ नगर, पाथर्डी, शेवगांव तालुक्यात रस्ते

नगर : प्रतिनिधी

**नगर, पाथर्डी व शेवगांव तालुक्यातील तीन रस्त्यांसाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून १८ कोटी ६६ लाख २७ हजार रूपयांचा निधी मंजुर करण्यात आल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.**

नगर तालुका हद्द मठपिंपरी ते डोबेलेवस्ती रस्ता ७ कोटी ७६ लाख ७८ हजार, पाथर्डी मांडवा मोहोज खुर्द कडगांव मिरी शंकरवाडी ते तालुका हद्द ५ कोटी ५५ लाख ४० हजार, शेवगांव राज्य मार्ग ५२ माळेगांव देवटाकळी मजलेशहर ते तालुका हद्द ४ कोटी १८ लाख ३० हजार असा निधी या तीन रस्त्यांसाठी मंजुर करण्यात आला आहे.

तीन तालुक्यांमधून रस्त्यांची मागणी करण्यात आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी २१ जुन २०२४ रोजी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता यांना पत्र देउन नगर तालुक्यात ९.१८ कि मी, पाथर्डी तालुक्यात ६ .९० कि मी, तसेच शेवगांव तालुक्यात ४ कि मी अंतराच्या रस्त्यांसाठी निधी मंजुरीबाबत पत्र दिले होते. हा निधी मंजुर करण्यासाठी खा. नीलेश लंके यांनी दिल्ली येथे पाठपुरावा केल्यानंतर तीनही कामांसाठी निधी मंजुर झाला असून तसे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अभियंत्यांनी खा. नीलेश लंके यांना कळविले आहे.



रस्त्याच्या कामासाठी निधी मंजुरीसाठी खा. नीलेश लंके यांनी पाठपुरवा करून हा निधी मंजुर करून घेतल्याबद्दल तीनही तालुक्यातील नागरीकांनी खा. नीलेश लंके यांना धन्यवाद दिले आहेत.

# जिल्हा सहकारी बँकेत ६९६ पदांसाठी भरती

२७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार

नगर : प्रतिनिधी

**जिल्हा सहकारी बँकेत संचालक मंडळाच्या मान्यतेने ६९६ पदांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. शुक्रवार (ता. १३) इच्छुक उमेदवारांना २७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. बँकेची भरती प्रक्रिया राबवण्यासाठी पुण्याच्या वर्कवेल इन्फोटेक कंपनीची निवड संचालक मंडळाने केलेली आहे.**

जिल्हा बँकेच्या लिपिक पदाच्या ६८७, वाहन चालकांच्या ४ आणि सुरक्षा रक्षकाच्या ५ जागांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. यासाठी उद्यापासून ऑनलाईन




अर्ज मागवण्यात येणार आहे.बँकेच्या लिपिक पदासाठी बी. कॉम, एमबीए (बँकिंग, फायनान्स) एलएसएम, डीएलटीसी यासह वाणिज्य विभागातील शिक्षणाची अट आहे. यासह बँकिंग क्षेत्रातील तीन वर्षाचा अनुभव या भरतीसाठी उमेदवारांना राहणार आहे.

बँकेच्या भरतीबाबत लेखी परीक्षेत पास झाल्यानंतर दहा गुणांची तोंडी परीक्षा उर्वरीत पान ३ वर




# ज्येष्ठ नेते सीताराम येचुरी यांचे निधन

कम्युनिष्ठ पक्षाचा बुद्धिजीवी चेहरा हरवला

नवी दिल्ली : वृत्तसंस्था



**सीपीएमचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचे निधन झाले. वयाच्या ७२ व्या वर्षी दिल्लीतील एम्समध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना काही दिवस एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. येचुरी यांना फुफ्फुसात संसर्ग झाल्याचे सांगण्यात येत आहे. अनेक दिवस डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत होते. मात्र त्यांना वाचवता आले नाही. कम्युनिस्ट पक्षाचा देशातील चढता आलेख आणि याच पक्षाला लागलेली उतरती कळा त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत पाहिली. त्यांच्या निधनाने कम्युनिस्ट पक्षाचा एक बुद्धिजीवी चेहरा हरपला आहे.**

सीताराम येचुरी यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून दिल्ली एम्समध्ये उपचार सुरु होते. त्यांच्या फुफ्फुसांना संसर्ग झाल्याचे निदान झाले होते. डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत होते. पण त्यांना येचुरींना वाचवण्यात अपयश आलं. येचुरी यांच्यावर १९ ऑगस्टपासून उपचार केले जात होते. न्युमोनिया, छातीत संसर्ग झाल्याने ते रुग्णालयात दाखल झाले होते. प्रकृती बिघडल्याने त्यांना आयसीयूमध्ये हलवण्यात आलं. ॲक्युट रेस्पिरेटरी इन्फेक्शनमुळे त्यांचे निधन झाले.

सीताराम येचुरी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव होते. १९९२ पासून ते सीपीआय (एम)च्या पॉलिट ब्युरोचे सदस्य होते. २००५ ते २०१७ अशी १२ वर्षे ते पश्चिम बंगालमधून राज्यसभेवर होते. १९७४ मध्ये ते ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियामध्ये सहभागी झाले. त्यानंतर वर्षभरात त्यांनी सीपीआयएममध्ये प्रवेश केला.

**राहुल गांधींकडून शोक व्यक्त**

सीताराम येचुरी यांच्या निधनाबद्दल विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. सीताराम येचुरी माझे मित्र होते. भारताच्या विचारांचे रक्षक आणि आपल्या देशाची उत्तम, सखोल जाण असलेले नेते होते. त्यांच्यासोबत केलेल्या प्रदिर्घ गप्पा स्मरणात राहतील. या दु:खाच्या क्षणी माझ्या सहवेदना त्यांच्या कुटुंब, मित्र आणि समर्थकांसोबत आहेत, अशा शब्दांत राहुल गांधींनी येचुरी यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

**कोण होते सीताराम येचुरी?**

सीताराम येचुरी यांचा जन्म १२ ऑगस्ट १९५२ रोजी मद्रासमध्ये एका तेलुगू ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील सर्वेश्वर सोमयाजुला येचुरी आंध्र प्रदेश राज्य परिवहन विभागात अभियंते होते. तर त्यांच्या मातोश्री कल्पकम येचुरी सरकारी अधिकारी होत्या. सीताराम येचुरींचं शिक्षण हैदराबादमध्ये झालं. हैदराबादमधील ऑल सेंट्स हायस्कूलमध्ये त्यांचं शालेय शिक्षण झालं.

सीताराम येचुरी यांनी नवी दिल्लीतील प्रसिडेंट्स एस्टेट स्कूलमध्ये प्रवेश घेतला. केंद्रीय माध्यमिक शिक्षण उर्वरीत पान ३ वर


# शरद पवारांना जवळ करण्याचा केंद्राचा प्रयत्न !

■ कार्यालय वाटपात एनसीपी असा उल्लेख
■ ठाकरेंना धक्का देत शिंदेंच्या सेनेला दालन

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**राज्यातील सत्ता संघर्षानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत अनेक राजकीय समीकरणे बदलली आहेत. त्यातच आता लोकसभा सचिवालयाच्या वतीने विविध पक्षांना संसदेत कार्यालयाचे वाटप करण्यात आले आहे. मात्र, यात पक्षांच्या नावाचा जो उल्लेख केला आहे, त्यावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

लोकसभेत सचिवालयाच्या वतीने पक्षांच्या संख्याबळानुसार कार्यालयाचे वाटप केले जाते. त्यामध्ये शरद पवारांच्या पक्षाला कार्यालय देण्यात आले आहे. मात्र, अजित पवार यांच्या पक्षाला संख्या बळाअभावी कार्यालय मिळालेले नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कार्यालयाच्या यादीमध्ये लोकसभेच्या सचिवालयाने शरद पवार यांच्या पक्षाचा उल्लेख नॅशनल काँग्रेस पार्टी अर्थात एनसीपी असा केला



आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हेच मूळ नाव आहे. मात्र, पक्ष फुटीनंतर हे नाव अजित पवार यांना मिळाला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार असे नाव शरद पवार यांच्या पक्षाला मिळाले होते.

दुसरीकडे शिवसेनाचा उल्लेख करताना शिवसेना शिंदे असा करण्यात आला आहे.

उर्वरीत पान ३ वर



# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या


## कुलर वापरताहेत? ही घ्या काळजी!

सध्या वाढत्या उन्हामुळे गरमी खूप होत आहे. लोक फॅनपेक्षा कुलर आणि एसीला अधिक पसंत देत आहेत. यामुळे आरामदायी वाटत असले तरी सुरक्षित वापर न केल्याने विपरितही घडत आहे. कुलरमध्ये पाणी भरून त्याचा वापर करावा लागतो, हे तुम्हाला माहितीच आहे. पाणी भरतानाही काळजी घेणे खूप आवश्यक आहे. नाहीतर, याचे घातक परिणाम तुम्हाला भोगावे लागू शकतात. कुलरचा वापर थ्री पीन प्लगवरच करावा. घरात अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर्स बसवून घ्यावेत. अर्थिंग योग्य असल्याची तपासणी सातत्याने करावी. कुलरमध्ये पाणी भरतेवेळी आधी कूलरचा वीज प्रवाह बंद करून प्लग काढावा आणि मगच त्यात पाणी भरावे. कुलर लाकडी स्टॅण्डवर ठेवावा. कुलरच्या आतील वीज तार पाण्यात बुडाली नसल्याची खात्री करून घ्यावी. कुलरमधील पाणी खाली जमिनीवर सांडणार नाही याची काळजी घ्या. ओल्या हाताने कुलरला स्पर्श करणे टाळा. कुलरची वायर सदैव तपासून बघा. फायबर बाह्यभाग असलेल्या व चांगल्या प्रतीच्या कुलरचा वापर प्राधान्याने करावा.




## फेसबुक वापरताना महिलांनी काय काळजी घ्यावी?

**आजकाल बऱ्याच महिला, मुली फेसबुकवर ॲक्टिव असतात. दैनंदिन स्टेटस अपडेट करण्यापासून तर सतत छायाचित्रे शेअर करताना त्या दिसतात. मित्र-मैत्रिणींशी संवादही फेसबुकच्या माध्यमातून साधला जात आहे. मात्र फेसबुकमुळे त्या जितक्या सोशल झाल्या आहेत आणि त्याचे फायदे त्यांना जाणवत आहेत, तितकेच तोटेही त्यांना अनुभवायला लागू शकतात. त्यामुळे फेसबुक वापरताना त्यांनी कोणती काळजी घ्यावी, याच्या टिप्स देत आहोत...**




- फोन नंबर काढा : फेसबुक अकाऊंटवर तुमचा फोन नंबर असेल तर तो लगेच काढून टाका. कारण या नंबरचा गैरवापर होऊ शकतो. एखाद्याला तुमच्याशी संपर्क साधायचा असेल तर तो मॅसेंजरची मदत घेऊ शकतो. यापूर्वी फेसबुक रजिस्ट्रेशनसाठी फोन नंबर मागितला जायचा, आता त्याची गरज नाही.
- जन्मतारिख काढा : फेसबुकवर जन्मतारीख ठेवण्याची गरज नाही. तुमच्या जन्मतारखेचा वापर करून हॅकर्स अनेक प्रकारची माहिती मिळवू शकतात. त्यामुळं जन्मतारीख काढून टाका.
- ठावठिकाणा सांगू नका : पिकनिकसाठी वा कार्यालयीन कामासाठी घराबाहेर जाताना त्याबद्दलची माहिती मित्रांना देण्याचा मोह आपल्याला टाळता येत नाही. या मोहापायी आपण कुठं जात आहोत, किती दिवसासाठी जाणार आहोत, काय करणार आहोत, ही माहिती फेसबुकवर सहज टाकतो. हे टाळा. कारण यामुळं तुम्ही कुठं जाणार आहात हे सर्वांना कळतं. त्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. विमानतळ तसंच, सुट्टीच्या ठिकाणांचे फोटो टाकण्याचं टाळा. विशेषत: घराबाहेर असल्याची माहिती देणं टाळा. अन्यथा, तुमच्या गैरहजेरीत तुमच्या घरी चोरी होण्याचा धोका असतो.
- पार्टी फोटोज नकोत : अनेकदा आपण पबमधील किंवा एखाद्या पार्टीत मद्यपान केल्याचे फोटो फेसबुकवर टाकतो. प्रायव्हसी सेटिंग हॅक करून एखादी व्यक्ती हे खासगी फोटो शेअर करू शकते. हे फोटो तुमच्या कुटुंबीयांनी पाहिल्यास कौटुंबिक कलह निर्माण होऊ शकतो. शिवाय, कंपन्या सध्या नोकरी देण्याआधी उमेदवाराचं सोशल अकाउंट तपासतात. त्यामुळं असे फोटो अपलोड करणं टाळा.
- बॉसला अनफ्रेंड करा : बॉसला फ्रेंडलिस्टमध्ये ठेवू नका. कारण, तुम्ही मांडलेल्या परखड मतांमुळं वा वैयक्तिक विचारांमुळं तो नाराज होऊ शकतो. त्यामुळं तुमची नोकरीही जाऊ शकते. अशी अनेक उदाहरणं आहेत. त्यामुळं फेसबुकच्या बाबतीत बॉसपासून सुरक्षित अंतर ठेवणं कधीही चांगलं.



- रिलेशनशिपची काळजी घ्या : माजी प्रियकराचा (अर्थात असल्यास) फोटो फेसबुकवरून हटविणं कधीही चांगलं. या फोटोंमुळं तुमच्या भावी जीवनात वादळं येऊ शकतात. विशेषत: ॲरेंज मॅरेजच्या वेळी अडचणी निर्माण होऊ शकतात.
- वादग्रस्त पोस्टवर प्रतिक्रिया नकोत : ज्या कोणत्या पोस्टस तुम्हाला आक्षेपार्ह, वादग्रस्त, कलह वाढवणाऱ्या अथवा अश्लील वाटतील, अशा पोस्टच्या वाटेला जाऊ नका. अशा पोस्ट लाईक-शेअर करु नका. त्यावर कसलीही प्रतिक्रिया देणे टाळा.

## इन्स्टा क्लिक!




**काही वर्षांपूर्वी फेसबुकने यूथच्या मनावर गारुड केलं. फॅन्सशी संवाद साधण्यासाठी सेलिब्रिटीजनीही फेसबुकला आपलंसं केलं. एफबीनंतर एक एक करून सगळे सेलिब्रिटीज ट्विटरवर आले. त्यापाठोपाठ इन्स्टाग्रामही सेलिब्जज मध्ये लोकप्रिय होताना दिसतेय. इन्स्टावर आपले फोटोज शेअर करत फॅन्सशी ते संवाद साधताहेत.**

### फोटोग्राफीला वाव मिळतो : सुयश टिळक



मला इन्स्टाग्राम जरा जास्तच आवडतं. या फोटो शेअरिंग सोशल नेटवर्किंग साईटसोबत मी स्वत:ला कनेक्ट करतो. कारण मला मुळातच फोटोग्राफीची आवड आहे. सर्वच ठिकाणी कॅमेरा सोबत नेणं शक्य होत नाही. अशावेळी आपल्या जवळ असलेल्या फोनमधून फोटो काढून ते आपल्या फॅन्सपर्यंत पोहोचवण्यात मला आनंद मिळतो. त्यातही मला त्यातला एक्सप्लोर हा ऑप्शनदेखील फार भारी वाटतो. कारण एका क्लिकमध्ये तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या जगातले, तुमचे इन्स्टाग्रामवरचे मित्र ज्याला कोणाला फॉलो करत असतील त्या सर्वांचे फोटोज पाहू शकता.

### जास्त ॲक्टिव्ह : मानसी नाईक



इन्स्टाग्राम हे माझ्या मते अगदी त्याच्या नावा प्रमाणे इन्स्टा आहे. अगदी लगेचच तुम्हाला हवा तो फोटो इथे अपलोड करू शकता. आणि मी तर फेसबुकवर जराही ॲक्टिव्ह नाही, ट्विटरवर त्यामानाने बरीच ॲक्टिव्ह आहे. पण इन्स्टाग्रामवर मी जास्त ॲक्टिव्ह आहे. मी माझं मीपण जपत स्वत:चे भरपूर फोटो इन्स्टाग्रामवर टाकत असते. माझे सेल्फी जास्त असतात. माझ्या रोजच्या आयुष्यातल्या कितीतरी गोष्टी तुम्हाला माझ्या इन्स्टाग्रामच्या पेजवर पाहायला मिळतील. त्या फोटोंवर लाईक करून किंवा कमेंट करून माझे फॅन्स माझ्याशी त्या पेजवर संवाद साधतात.

### न चुकता फोटो टाकतो : अभिजित खांडकेकर

जेव्हा मला माझ्या फ्रेंड्सकडून इन्स्टाग्रामबद्दल समजलं त्यानंतर मी लगेचच यावर जॉइन झालो.



मला या साईटवरचं सगळ्यात जास्त आवडतं ते म्हणजे ही संपूर्ण फोटोग्राफी बेस असलेली साइट आहे. मला मुळात फोटोग्राफीची आवड आहे. लोकांना माहित नसलेली माझ्या व्यक्तिमत्त्वातली बाजू मी या साइटच्या मदतीने लोकांपर्यंत पोहोचवू शकतो. मी न चुकता रोजच्या रोज या साइटवर फोटो टाकत असतो. यात अजून एक आकर्षक गोष्ट म्हणजे तुम्ही हॅशटॅग वापरत तुमचं लोकेशन संपूर्ण जगासमोर ठेऊ शकता.

### फिल्म प्रमोशनसाठी फायदा – श्रुती मराठे



इन्स्टाग्रामवरची सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे इथे तुम्हाला स्टेटस अपडेट वगैरे करण्याची गरज भासत नाही. इथे तुमच्या मनातलं बोलण्याचं काम हे तुमचे फोटोच करतात आणि मला सर्वात जास्त हेच भावतं. दुसरं म्हणजे यात इनबिल्ट एडिटिंग असतं. मग फक्त फोटो काढा, स्वत:च त्यात इफेक्ट टाकत एडिट करा, त्याला तुमच्या पसंतीने सुंदर बनवा आणि लोकांसोबत शेअर करा. माझ्या मते आपल्या नाटकाच्या अथवा सिनेमाच्या प्रमोशन्ससाठीदेखील हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. मी माझ्या सिनेमाच्या मुहूर्तापासून ते त्याच्या प्रमोशनल दौऱ्यांपर्यंतचे फोटो इथे टाकत असते.


### एफबी ट्विटरपेक्षा उजवं – सिद्धार्थ चांदेकर



मला इन्स्टाग्राम अतिशय आवडतं. इन्स्टाग्राम हा एक चांगला आणि वेगळा पर्याय आहे असं मला वाटतं. म्हणजे फेसबुकवर कितीही लिहायची मुभा असल्याने किती लिहू आणि काय काय लिहू असं होतं. ट्विटरवर फक्त १४० शब्दांत लिहायचं म्हणजे जरा अवघड होऊन बसतं. पण इथे फोटो शेअर करायचा असतो. म्हणजे आपल्याला काहीच लिहायची गरज नाही. आपल्या मनात जे काही येतंय त्यासाठी फोटो बोलतो आणि ते मला फार जास्त आवडतं. जर इन्स्टाग्राम क्रिएटीव्हपणे वापरलं तर फिल्म प्रमोशनसाठीसुद्धा ह्याचा उत्तम उपयोग होऊ शकतो.

## कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस?


**कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस असून तो तुमचा डेटा चोरी करू शकतो, अशा आशयाच्या बातम्या काही दिवसांपूर्वी पसरल्या आणि काही युजर्सनी या ॲपला राम राम ठोकला. हे प्रकरण इथेच न थांबता गुगल प्ले स्टोअर वरून हे ॲप मागे घेतलं गेलं. एव्हाना सर्वांना या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात आलं आणि एरवी तसा हलक्यात घेण्यात येणारा हा मुद्दा लोकांसमोर समस्या बनून आला, तो म्हणजे जाहिराती!**




एखाद्या कागदपत्राची सॉफ्टकॉपी किंवा पीडीएफ तयार करण्याची गरज या ना त्या कारणाने बहुतांश जणांना भासते. ही सुविधा पुरवणारी शेकडो अँड्रॉइड ॲप्लिकेशन्स आज गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत. यातील सर्वाधिक लोकप्रिय ॲप म्हणजे कॅम स्कॅनर. कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांपासून ते अगदी कॉलेज विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्येक जण आपल्या स्मार्टफोनमध्ये कॅम स्कॅनर बाळगून होता. मात्र कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस असल्याच्या बातमीचं लोण पसरलं आणि सर्वांनी ते ॲप तातडीनं काढून टाकलं. प्रकरणाच्या अधिक खोलात गेल्यावर, कॅम स्कॅनरमधील या व्हायरसचा उगम, त्या ॲपमधील ॲडव्हर्टाइझमेंट सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कीट अर्थात ॲड एसडीके मध्ये असल्याचं उघड झालं. कॅम स्कॅनरसारखी मोफत सेवा देणाऱ्या ॲप्सचं मुख्य उत्पन्न जाहिराती असतात. या जाहिराती ॲपच्या कोडमध्ये नसून, ॲड एसडीकेमध्ये असतात. ॲड एसडीके हा तुमच्या ॲप आणि जाहिरातींमधील दुवा असतो. अर्थात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्यासाठी अधिकाधिक जाहिराती मिळवण्याची चढाओढ असते. याच नादात कॅम स्कॅनरला ॲड हब नावाच्या कंपनीने काही ॲड एसडीके प्रदान केले आणि तिथंच सगळं फिस्कटलं. त्या ॲड एसडीकेमध्ये ट्रोजन डाऊनलोडर होता जो अवैधरित्या तुमच्या फोनमध्ये शिरून काही फाइल्स डाऊनलोड करायला सुरुवात करतो. यावर नियंत्रण मिळवणं सामान्य युजर्सना शक्य नसतं. काही युजर्सना या घटनेनंतर विचित्र अनुभव आले. विचित्र जाहिराती, असंबद्ध गोष्टींसाठीची सबस्क्रिप्शन्स या सगळ्याला वैतागून युजर्सनी प्लेस्टोअर रिव्ह्यू सेक्शनमध्ये आपल्या रागाला वाट मोकळी करून दिली. या ॲपचं रेटिंग इतक्या झपाट्याने खाली आलेलं पाहून कंपनीने प्रकरणाची अंतर्गत छाननी केली आणि झालेला प्रकार उघडकीस आला. परिणामी, कॅम स्कॅनर प्ले स्टोअरवरून काही काळासाठी काढावं लागलं.

### काय खबरदारी घ्याल?

- जर तुमच्या फोनमध्ये अचानक अशा जाहिराती वारंवार येऊ लागल्या तर तुमचा फोन सेफ मोडमध्ये रिस्टार्ट करा आणि तुम्ही जी ॲप्स नुकतीच इन्स्टॉल केली आहेत, ती तातडीने काढून टाका. नंतर नॉर्मल मोडमध्ये रिस्टार्ट करा. तुमचा फोन सेफ मोडमध्ये कसा चालू करायचा याची माहिती तुम्हाला इंटरनेटवर सहज मिळू शकेल.
- गुगल प्ले स्टोअरच्या मेन्यूमधील प्ले प्रोटेक्टवर जाऊन वारंवार आपल्या ॲप्सच्या सुरक्षिततेची खात्री करून घ्या.
- जर तुम्ही ॲप्स डेव्हलपर असाल तर गुगलने नुकत्याच बंदी घातलेल्या ॲड एसडीकेच्या नावांची यादी पडताळून पाहा.




## ती मोबाईलवर नक्की करते काय?

**सतत मोबाइलमध्ये डोकं खुपसून बसलेल्या तमाम महिलावर्गाबद्दल पुरुषांना भलतीच उत्सुकता असते. या बायका मोबाइलवर नेमकं करतात तरी काय? असा प्रश्न अनेकांना असतो. स्मार्टफोनचा उपयोग खरंच स्मार्टपणे होतो की नुसतंच टीपी आणि गप्पा-टप्पांसाठी त्याचा वापर होतो, यावर बोलत्या झालेल्या काही तरुणी...**



### ॲप्सची धमाल



माझ्या स्मार्टफोनचा मी अनेक प्रकारांत वापर करून घेत असते. नवनवीन ॲप्स शोधून काही नवीन शोधण्याची हौस मला आहे. स्मार्टफोनचा वापर रस्ते शोधायला, गाणी ऐकायला, वेगवेगळ्या देशाच्या वेळा आणि हवामान बघायला, ऑनलाइन शॉपिंग करायला मी माझ्या फोनचा वापर करते. अनेकदा रेल्वे, बस, सिनेमाची तिकीटं या गोष्टींची माहिती मिळवायला, रिझर्वेशन्स करायला मी फोनच वापरते. महिलांसाठी असलेली सेफ्टी ॲप्सही मी वापरते. व्हॉट्स ॲपमुळे शाळेतले वा जुने मित्र-मैत्रिणी एका क्लिकवर मला मिळाले. या सर्व गोष्टींची माहिती मिळवायला आणि परदेशातील माझ्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यासाठी हा स्मार्टफोनच माझ्या कामी येतो. यामुळेच मला कॉलेजच्या नोट्सही एका क्लिकवर मिळतात. शिवाय व्हॉटसॲपच्या माध्यमातून एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीचा फोटो क्षणात दुसऱ्या व्यक्तीकडे पाठवता येतो.

**– प्राजक्ता जगताप**

### व्यवसायासाठी वापरते

माझा फोन कोणता महागडा ब्रँडेड स्मार्टफोन नाही. पण त्याचा स्मार्टली वापर कसा करायचा, हे मात्र मी जरूर पाहते. मी एक ब्लॉगर आणि कंटेट रायटर आहे. त्याशिवाय अनेक छोट्या उद्योजकांना त्यांच्या उद्योगाकरिता ब्लॉगिंग आणि सोशल मीडियावर मार्केटिंगसाठी मी मदत करत असते. माझा हा व्यवसाय मी संपूर्णतः माझ्या स्मार्टफोनच्या माध्यमातूनच चालवते. फोन, एसएमएस ही तर नेहमीच्या पठडीतले संपर्काची माध्यमं झाली पण त्याव्यतिरिक्त व्हॉट्स ॲप, हाईक, ईमेल अशी ॲप्स वापरून ग्राहकांच्या संपर्कात राहणं सोपं जातं. व्यवसायवाढीसाठी ब्लॉगिंग आणि सोशल मीडियाचा कसा वापर करू शकतात हे ग्राहकांच्या निदर्शनाला आणता येतं. थेट ब्लॉगिंगची ॲप्लिकेशन्स वापरून कुठेही बसल्या बसल्या मी ब्लॉगवर लिहू शकते. तेवढ्यासाठीच मी मराठी कीबोर्ड असलेले मल्टिलिंग हे ॲप इन्स्टॉल करून घेतलं आहे. अगदी हा लेखसुद्धा मी स्मार्टफोनवरच टाइप केलाय. रोजच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्यासाठी एक्स्पेन्स मॅनेजर सारखं ॲप मी वापरते. दिवसातल्या अनेक नोंदी लिहिण्याकरिता जी-नोट्स सारखं ॲप तर तारीखवार घटना लक्षात ठेवण्याकरिता कॅलेंडर ॲप वापरते.

**– श्रेया रत्नपारखी**

### नोट्ससाठी उपयोगी

कॉलेजमध्ये बसून सगळ्या नोट्स काढणं शक्य होत नाही. मग ते काम माझा स्मार्टफोन करतो. माझ्या फोनचा कॅमेरा खूप चांगला आहे. त्यामुळे नोट्सचे झेरॉक्स न काढता फोटो काढते. मग घरी बसून नोट्स पूर्ण करते. त्यामुळे झेरॉक्सचे पैसेही वाचतात. क्विक ऑफिससारख्या ॲपमधून पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन्स बनवता येतात. शिवाय मी सगळ्यात जास्त वापर करते तो फोन डिक्शनरीचा. यामुळे अडलेले शब्द शोधता येतात. एकूणच माझा फोन मला अभ्यासात खूप मदत करतो.



**– धनश्री खणकर**

### माहितीचा खजिना

मी रोजची वर्तमानपत्रं फोनवरच वाचते. ई-मेल्स चेक करणे आणि पाठवणे यासाठी मी फोनचा उपयोग करते. माझ्या फोनवर मी बँकेचं ॲपही डाऊनलोड केलंय. त्यावरून बँकेचे व्यवहारही पटापट होतात. लाइट आणि फोनची बिलं तसंच टिव्हीचं रिचार्जसुद्धा मी फोनवरूनच करते. ई-बँकिंग आणि मोबाईल बँकिंगसाठी फोनचा वापर करते. स्मार्टफोन आल्यापासून मी कम्प्युटरचा वापर कमी केला आहे. स्मार्टफोनवरच मी ई-बुक्स वाचते. जुनी गाणी ऐकते. ऐतिहासिक, पौराणिक माहिती वाचते. न्यूज चॅनेलच्या ॲपवरून ताज्या बातम्या मिळवते. गुगलवरून अनेक विषयांची माहिती मिळवते. विविध ॲप्स वापरून माझी कामं सोपी कशी होतील ते पाहते. **– तन्वी घरत**

## शॉर्ट न्यूज

### दरोडे टाकणाऱ्या टोळीला अटक

**शेवगाव :** शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील वाड्या वस्त्यांवर जावून बाहेरून कडी लावून दरोडे टाकणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. आरोपींनी शेवगाव व पाथर्डी तालुक्यात धुमाकूळ घातला होता. त्यांनी सात ठिकाणी दरोडे टाकल्याची कबुली दिली असून, या कारवाईमुळे १५ गुन्हे उघडकीस आले आहेत. उमेश रोशन भोसले, शिवाजी रोशन उर्फ शेरू भोसले, दौलत शुकनाश्या काळे, सिसम वैभव काळे, आकाश उर्फ फय्याज शेरू लाल्या काळे असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

### झाडांची कत्तल; वनविभागाकडून दंड वसूल

**पारनेर :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील गट नंबर १४३९, १४४०, १४४१ या गायरान जमिनीवर मुख्यमंत्री सौरऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे. संबंधित ठेकेदाराने शेकडो झाडांची कत्तल केली. यासंबंधीची तक्रार अंकुश पायमोडे, उपसरपंच रामभाऊ तराळ, मळीभाऊ रांधवन, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, बबलू झावरे यांनी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे दोन वेळा लेखी निवेदनाद्वारे केली होती. त्या अनुषंगाने टाकळीच्या वनविभागाच्या वनरक्षक ज्योती माधव दाभाडे यांनी बेकायदा कत्तल झालेल्या झाडांचा पंचनामा केला.

### नुकसान झालेल्या पिकांच्या पंचनामे करा

**नेवासा :** तालुक्यातील गंगथडीच्या पट्ट्यात प्रवरासंगम, जळके बुद्रुक भागात गेल्या आठ दिवसापासून कमी अधिक प्रमाणात रोज पाऊस पडत असल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. तरी शासनाने परिसरात पहाणी करून पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या भागातील प्रमुख पीक सोयाबीन व कपाशी आहे. सोयाबीन पीक काढणीस येत असताना सततच्या पावसाने पिवळे पडून वाढ खुंटली आहे, तसेच कपाशी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सुरुवातीला जूनमध्ये समाधानकारक पाऊस पडला होता. आता अतिवृष्टी पाऊस झाल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

### ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे आंदोलन मागे

**कोपरगाव :** मतदारसंघातील वाकडी ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे मागील पंधरा महिन्यांपासून वेतन थकल्यामुळे कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन पुकारले होते. यावर योग्य तोडगा काढल्यामुळे कर्मचाऱ्यांना पाच महिन्यांचे वेतन मिळणार आहे. त्यामुळे त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले आहे. वाकडी ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे मागील पंधरा महिन्यांचे वेतन थकले होते. सदर वेतन मागणीसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामसेवक यांच्याकडे वेतन मिळावे यासाठी मागणी केली होती.

### सैनिक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी सांगळे

**श्रीगोंदा :** आजी-माजी त्रिदल सैनिक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी तालुक्यातील येळपणे येथील संदीप सांगळे तर श्रीगोंदा शहराध्यक्षपदी नवनाथ खामकर यांची फेरनिवड करण्यात आली आहे. श्रीगोंदा तालुका आजी-माजी सैनिक संघटनेच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्षपदी प्रकाश चव्हाण यांची निवड करण्यात आली. त्रिदल सैनिक संघटना कार्यकारिणीची बैठक नुकतीच उक्कडगाव येथे झाली.

# राहुल गांधींचे वक्तव्य संविधानाचा अपमान करणारेच

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रतिक्रिया

**लोणी : प्रतिनिधी**

**विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन आरक्षण रद्द करण्याचे वक्तव्य म्हणजे एकप्रकारे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा अपमान करणारे असून,त्यांच्या वक्तव्याने काँग्रेसचा आरक्षणाच्या संदर्भातील खोटेपणा लोकांच्या समोर आला असल्याची प्रतिक्रिया महसूल तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.**



माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,परदेशात गेल्यानंतर राहूल गांधीवर तिथल्या वातावरणाचा परीणाम होतो त्यातून असे वक्तव्य करण्याचे शहाणपण त्यांना सुचत असल्याचा टोला लगावून परदेशात जावून देशविरोधी वक्तव्य करून प्रसिध्दी मिळविण्याची हौस आहे. पण आपण काय बोलतो याचे भानही त्यांना राहात नाही.यापुर्वी भारतीय लोकशाहीच्या विरोधातील वक्तव्य असो की, संसदेत त्यांच्याच पक्षाच्या पंतप्रधानांच्या कालावधीतील अध्यादेश फाडण्याची राहूल गांधी यांची भूमिका म्हणजे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा अपमान करणारीच होती असा आरोप त्यांनी केला.

आता थेट आरक्षण रद्द करण्याच्या त्यांच्या वक्तव्याने काँग्रेसची दुतोंडी भूमिका उघड झाली आहे. लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटिव्ह पसरवून दिशाभूल करणारे चेहरे जनतेलासमजलेअसल्याकडे लक्ष वेधून राहूल गांधीचे वक्तव्य संविधानाचा अपमान करणारे आणि जनतेचा हक्क, अधिकार हिरावून घेणारे असल्याने त्यांच्या वक्तव्याचा मंत्री विखे पाटील यांनी तीव्र शब्दात निषेध केला.

काँग्रेसने नेहमीच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला.त्यामुळे राहूल गांधीची भाषा आणि काँग्रेसची आरक्षणाच्या बाबतीतली भूमिका संविधानबदलाचीअसल्याचे आता लपून राहीलेले नाही. भारतीय जनता पक्षाने नेहमीच संविधानाचा आदर केला.आरक्षण रद्द होवू देणार नाही असे विखे पाटील यांनी ठामपणे सांगितले.

# सूरज बाबुराव पाचंगे भाजपा युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी

## आमदार पंकजा मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

**शिरुर : प्रतिनिधी**

**ढोकसांगवी, ता. शिरुर येथील युवा उद्योजक सुरज बाबुराव पाचंगे यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.**



आमदार पंकजा मुंडे यांच्या हस्ते पाचंगे यांना नुकतेच या नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, प्रदीप कंद, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदीप सातव, प्रदीप सोनवणे, प्रशांत घावटे, संदीप पाचंगे, वैभव सोनवणे, बाळकृष्ण जाधव आदी.उपस्थित होते.

सूरज पाचंगे हे शिरुर शहर भाजपा व्यापारी आघाडीचे अध्यक्ष बाबुराव पाचंगे यांचे चिरंजिव आहेत. पक्ष संघटना वाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असून, पक्षाचे विचार व ध्येयधोरणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोचविणार असल्याचे नूतन उपाध्यक्ष पाचंगे यांनी निवडीनंतर बोलताना सांगितले.

## काव्यरंग

### अष्टविनायक



हे विनायका लंबोदरा
सिंदुरवर्णा मुशकवहना
वक्रतुंडा तु भालचंद्रा
एकदंता श्रीगजानना

मोरगावीचा तु मयुरेश्वर
सर्व कामनांचा अधिपती
मोरया गोसाव्याने केली
तुझीच मनोभावे भक्ती

सर्व चिंता मिटवणारा
थेऊरचा तु चिंतामणी
हेरंबा गणाधिशा तुझा
आठव येतो क्षणोक्षणी

सिध्दटेक सिध्दिविनायका
शुभ कार्यारंभी तुझे
स्तवन
उजव्या सोंडेच्या गजानना
तव चरणी लागो तन मन

महागणपती रांजणगांवचा
रिध्दी सिध्दीची तु देवता
भक्तांचा तुच तारणहार
अखंडीत नंदादिप तेवता

ओझरचा विघ्नेश्वर बाप्पा
सर्व संकटातून तारणारा
कुकडी नदीतीरी वसला
कृर आसुरांना मारणारा

लेण्याद्रीचा गिरीजात्मक
मंदिर गुहेतील पाषाणाचे
तुझ्या नामाने जळती पापे
समुळ नष्ट भांडार
अज्ञानाचे

पंचवीस फुटी कळसाचे
मंदिर पुरातन अति भव्य
महडच्या वरदविनायका
हा इतिहास तुझा दिव्य

गौरीतनया बल्लाळेश्वरा
मुक्काम श्री क्षेत्र पाली
पुर्वाभिमुख प्रसन्न मुर्ती
पाहता हास्य उमटे गाली

चौदा विद्येची तु देवता
तु शिवपुत्र पार्वतीनंदन
चौसष्ठ कलेचा अधिष्ठाता
निशिदिन तुजला वंदन !

**एकनाथ औटी**
वडझिरे ,पारनेर,
मो . ९८ ८१५३०५०६

# निमगाव भोगी ग्रामस्थांना किडनीचे विकार, कॅन्सरची लागण !

## प्रिस्टाईन चॅरीटी या संस्थेने गावात केलेल्या आरोग्य सर्वेक्षणातून ही बाब उघड रांजणगाव एमआयडीसीतील महाराष्ट्र एन्व्हायरो कंपनीच्या दूषित पाण्याचा परीणाम

**शिरूर : सतीश डोंगरे**

**रांजणगाव एमआयडीसी मध्ये देशी-विदेशी कारखाने आले त्यातून स्थानिक लोकांचा आर्थिक स्तर वाढला, जीवनमान उंचावले असे असले तरी मात्र याच कंपन्या आता स्थानिक नागरीकांच्या जीवावर उठल्या आहेत. या कंपन्यामुळे ग्रामस्थांचे स्वास्थ्य बिघडले आहे.** कंपनीच्या दूषित पाण्यामुळे निमगाव भोगी या गावातील चार ते पाच ग्रामस्थांच्या किडन्या निकाम्या झाल्या असून कॅन्सरचीही सुरुवात झाली आहे. पुण्याच्या प्रिस्टाईन चॅरिटी फाउंडेशन या संस्थेने गावात केलेल्या आरोग्य सर्वेक्षणातून ही बाब पुढे आली त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.





रांजणगाव एमआयडीसीत महाराष्ट्र एन्व्हायरो पावर लिमिटेड नावाची कंपनी आहे. या कंपनीच्या दूषित पाण्यामुळे संपूर्ण निमगाव भोगी गांव बाधित झाले आहे. गावातील अनेक जनावरे या दूषित पाण्यामुळे मृत पावली आहेत. याशिवाय जमीनी नापीक झाल्या आहेत. दुसरीकडे नागरीकांच्या आरोग्याच्या तक्रारी ही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पुण्याच्या प्रिस्टाईन चॅरीटी फाउंडेशन या संस्थेने निमगाव भोगी गावात एक आरोग्य शिबिर आयोजित केले होते. यावेळी नागरिकांच्या आरोग्य तपासणीतून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. अनेक नागरिकांना गंभीर आजार आणि व्याधींनी ग्रासले आहे. दूषित पाण्यामुळे संपूर्ण गावाचेच स्वास्थ्य बिघडून गेले आहे. अनेक वेळा तक्रारी करूनये कंपनीच्या वतीने कुठलीच उपाययोजना करण्यात येत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्याबरोबरच प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे तक्रारी करूनही त्यांच्याकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

प्रिस्टाईन चॅरिटी फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रात विविध ठिकाणी मोफत आयुर्वेदिक वैद्यकीय शिबिरे आयोजित केली जातात. शिबिरांमध्ये मोफत तपासणी आणि तज्ज्ञांकडून सल्ला दिला जातो. या संस्थेला निमगाव भोगी या बाधित गावाबद्दल माहिती मिळाल्यानंतर ती गांभिर्याने घेत संस्थेचे एक पथक डॉक्टरांसह गावात पोहोचले. आरोग्यविषयक तक्रारी असणाऱ्या ग्रामस्थांची तपासणी केली. या आरोग्य तपासणीत ग्रामस्थांना किडनी विकार, कॅन्सर यांसह अनेक गंभीर आजारांनी जखडले असल्याचे निदर्शनास आले.

रांजणगाव एमआयडीसीतील महाराष्ट्र एन्व्हायरो पावर लिमिटेड ही घातक कंपनी कायमस्वरुपी बंद व्हावी यासाठी निमगाव भोगी ग्रामस्थांनी आता टोकाचा लढा पुकारलाय. त्यांच्या या लढ्याला प्रदूषणाची झळ पोहोचलेल्या आमदाबाद, ढोकसांगवी, सरदवाडी, कर्डेलवाडी, अण्णापूर, आमदाबाद, शिरूर ग्रामीण या गावांनी ही साथ दिली आहे. या सर्वांनी येत्या २० सप्टेंबरला पुणे-नगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली आहे.

(पान १ वरुन)

### जिल्हा सहकारी बँकेत ६९६ पदांसाठी भरती

घेण्यात येणार आहे. या परीक्षेत तोंडी पास झाल्यानंतर जिल्हा बँकेत काम करण्याची संधी मिळणार आहे. यातही सुरूवातीच्या वर्षभर लिपिकांना १५ हजारांवर, तर वाहन चालक व सुरक्षा रक्षक यांना अवघ्या १२ हजारांत काम करावे लागणार आहे. त्यांचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झाल्यावर ते बँकेच्या सेवत येणार आहेत. दरम्यान त्यांना ३ वर्षे बँकेची नोकरी सोडता येणार नसल्याची हमी द्यावी लागणार आहे.

### ज्येष्ठ नेते सीताराम येचुरी यांचे निधन

बोर्डाच्या उच्च माध्यमिक परिक्षेत ते देशात पहिले आहे. यानंतर त्यांनी दिल्लीच्या स्टिफन कॉलेजमधून अर्थशास्त्रात बीए केलं. त्यानंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून अर्थशास्त्रात एमए केलं. देशात आणीबाणी लागू असताना त्यांना अटक झाली होती. त्यावेळी ते जेएनयूचे विद्यार्थी होते.

### शरद पवारांना जवळ करण्याचा केंद्राचा प्रयत्न !


तर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव मिळाले आहे. शिवसेनेच्या बाबतीमध्ये शिवसेनेला या पूर्वी मिळालेले जुन्या संसद भवनातील १२८ क्रमांकाचे दालन शिंदे यांच्या पक्षाला मिळाले आहे. गेल्या वेळी देखील शिवसेनेला हेच कार्यालय मिळाले होते. मात्र यावेळी हे कार्यालय शिवसेना शिंदे या पक्षाला देण्यात आले आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला १२८ ए हे दालन देण्यात आले आहे.

राज्यात सत्ता संघर्षानंतर अनेक राजकीय घडामोडी घडल्या आहेत. त्यात लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्वबळावर पूर्ण बहुमत मिळाले नसले तरी मित्र पक्षांच्या मदतीने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. यामध्ये टीडीपी हा पक्ष नव्या संसद भवनामध्ये कार्यालय मिळवणारा पहिला पक्ष ठरला आहे. तेलगू देसम हा सध्या भारतीय जनता पक्षाचा सहकारी मित्र पक्ष आहे. पक्षाचे प्रमुख आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू हे सध्या सरकारमध्ये सहभागी आहेत. याशिवाय शिंदे यांच्या सात खासदारांचा पाठिंबा देखील सरकारला मिळाला आहे. तर बिहारमधील भाजपचा मित्र पक्ष असलेल्या नितेश कुमार यांच्या पक्षाला देखील संविधान सदन मध्ये जागा देण्यात आली आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# आधुनिक ऋषी : आचार्य विनोबा भावे

आचार्य विनोबा भावे (१८९५-१९८२) यांची काल ११ सप्टेंबर रोजी जयंती होती. ते महात्मा गांधींचे शिष्य होते. आचरणाने आणि विद्वत्तेने ते महात्माजींपेक्षाही किती तरी श्रेष्ठ होते. तरी आचार्य विनोबांनी महात्माजींचे शिष्य होऊन राहणेच पसंत केले.



आचार्य विनोबा भावे यांना आधुनिक ऋषी म्हणत.
आपले प्राचीन ऋषी सूत्ररूपात बोलत.
स्वल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखमस्तोभम्।
ज्यात कमीत कमी अक्षरे असतात, जे संदेह असणारे नसतात, मोठी गोष्ट सारांशरूपाने सांगणारे असतात, सर्वत्र लागू पडणारे असतात आणि ज्यात निरर्थक शब्द नसतात ( अस्तोभम्) त्याला सूत्र म्हणतात.
आचार्य विनोबाही सूत्ररूपात बोलत. लिहीत. त्यांची ही सूत्ररूप वाक्येच पाहू :
दोनदा शिकतो तो शिक्षक.
शिक्षक असला तरी त्याला आपले ज्ञान वाद्यार्थ्यांच्या मनात उतरविला किंवा संक्रमित करता आले पाहिजे. म्हणजेच शिक्षक जरी एकदा शिकला असला तरी ज्ञानवितरणाचे कौशल्यही त्याला शिकून घेतात आले पाहिजे. म्हणून दोनदा शिकतो तो शिक्षक.
राखून ठेवतो तो राक्षस. देतो तो देव.
जो स्वार्थी असतो तो वस्तू किंवा धनसंपदा आपल्या स्वतःसाठी राखून ठेवतो. त्याला विनोबा राक्षस म्हणतात. यांच्या उलट जो आपल्या मालकीच्या वस्तू किंवा धनसंपदा मुक्तहस्ताने दुसऱ्यांना वाटतो. त्याला देव म्हटले पाहिजे, असे विनोबा म्हणतात.
विनोबांची हीच शैली त्यांच्या अन्य लेखनातही आढळून येते. मधुकर, गीता प्रवचने या त्यांच्या ग्रंथांतले लेख संक्षिप्त आणि अल्पाक्षरी दिसतील. हा आपल्या प्राचीन ऋषींच्या सूत्रशैलीचाच परिणाम म्हणावा लागेल.
आधुनिक ऋषी आचार्य विनोबा भावे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना शत शत वंदन.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)

● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार

● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार

● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर

ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# सवलतीच्या दरातील वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड !

■ राणीताई लंके यांच्या माध्यमातून उपक्रम ■ ५० टक्के सवलतीचे ग्राहकांना आकर्षण



पारनेर : प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या तथा जिल्हा नियोजन समितीच्या मा. सदस्या राणीताई नीलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर येथे सुरू करण्यात आलेल्या ५० टक्के सवलतीच्या दरातील वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडाली आहे.**

स्मार्ट ॲन्ड्रॉईड एल ई डी टी व्ही, रेंजर सायकल व पाण्याचा फिल्टर यांचा ५० टक्के सवलतीच्या दरामध्ये विक्री करण्यात येत असलेल्या वस्तूंमध्ये समावेश आहे. पारनेर येथील खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयाबाहेर हे विक्री केंद्र सुरू करण्यात आले असून नुकतेच खा. लंके यांचे वडील निवृत्त शिक्षक ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी संदीप चौधरी, रविंद्र राजदेव, अनिल चौधरी, अमोल झेंडे, हौशीराम चेडे, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ज्ञानदेव लंके यांनी सांगितले की, पन्नास टक्के सवलतीमध्ये वस्तू मिळाल्याने ग्राहकांचा चांगला फायदा होतो आहे. जिल्हा परिषदेच्या सदस्या राणी लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळेल यात शंका नाही. यापूर्वीही सण, उत्सवांच्या पार्श्वभुमीवर आयोजित करण्यात आलेल्या अशाच सवलतीच्या दरातील विक्री केंद्रांना तालुक्यासह तालुक्याबाहेरील ग्राहकांनी मोठा प्रतिसाद दिला. या संधीचा ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन लंके यांनी केले.

यावेळी बोलताना रविंद्र राजदेव म्हणाले, आपल्या मतदारसंघातील ग्राहकांना विविध सवलतींचा लाभ मिळावा यासाठी खा. नीलेश लंके यांच्यासह राणीताई लंके हे नेहमीच आग्रही असतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभही मतदारसंघात मोठया प्रमाणावर झाला आहे.

### कोणत्या वस्तूची किती किंमत ?

**या योजनेअंतर्गत ८ हजार रूपयांची रेंजर सायकल ४ हजार रूपये, ३२ इंच स्मार्ट एलईडी १६ हजारांऐवजी ७ हजार ९९९, ४० इंच एलईडी २४ हजार ऐवजी ११ हजार ९९९, ४३ इंच एलईडी २९ हजार ऐवजी १४ हजार ९९९, ५० इंच एलईडी ४६ हजार ऐवजी २२ हजार ९९९ तर १० हजार रूपयांचा पाण्याचा फिल्टर ४ हजार ९९९ रूपयांना उपलब्ध आहे.**

### खरेदी करताना कशाची आवश्यकता ?

**कोणतीही वस्तू खरेदी करताना आधार कार्ड किंवा रेशन कार्ड सोबत आणावे. टिव्ही फिटींगचा खर्च अतिरिक्त राहील. वस्तू खरेदीनंतर बिल दिले जाईल.१० सप्टेंबर रोजी सुरू झालेली ही योजना २५ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.**

# प्रवरा संस्थेचा शिक्षणातून विकासाचा संदेश

प्राचार्य अर्जुन चाटे यांचे प्रतिपादन



■ अळकुटी महाविद्यालयात शिक्षणाकडून विकासाकडे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अळकुटी : प्रतिनिधी

**पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकार क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यामुळेच त्यांना सहकाराचे आद्यप्रवर्तक म्हणून ओळखले जाते. डॉ. विखे यांच्या पुढच्या पिढीकडून प्रवरा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाकडून विकासाकडे हा संदेश समाजाला दिल्याचे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अर्जुन चाटे यांनी केले.**

पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयामध्ये प्रवरा सांस्कृतीक व क्रीडा महोत्सव तसेच गणोशोत्सवाचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य प्रा. अर्जुन चाटे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

प्रा. चाटे म्हणाले, विना सहकार नाही उध्दार या उक्तीप्रमाणे समाजातील प्रत्येक समाज घटकाने सहकार्याचे धोरण राबवून स्वतः बरोबरच समाजाचाही विकास साध्य केला पाहिजे. अळकुटी महाविद्यालय सहकारातून समृध्दीकडे व शिक्षणातून विकासाकडे या उपक्रमाद्वारे समाजात प्रबोधन करत असल्याचे चाटे यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य प्रशांत लोखंडे, प्रा. संजय जाधव, प्रा. पुजा तांबे, डॉ. शांता थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. दत्तात्रेय शेळके, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, डॉ. कुंदा कवडे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. संदीप गेटम, प्रा. मोहन माने, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. ऋषीकेश गिते, प्रा. अमोल नालकर, प्रा. पुजा वैरागर, प्रा. पांडूरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. राजाराम गोर्डे, गोरख घोलप, सुर्यमाला भोर, सुनिता भालेराव, नितीन घोलप, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मनोहर कनिंग्ध्वज, मच्छिंद्र मस्कुले, रविंद्र वाघ, वैजनाथ आवारी, शिवाजी कांबळे, पांडूरंग शितोळे उपस्थित होते. प्रा. स्वाती फापाळे यांनी प्रास्ताविक तर प्रा. विशाल रोकडे यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांचा सामाजिक संदेश

**यावेळी सहकारातून समृध्दीकडे व शिक्षणाकडून विकासाकडे या विषयावर अधारित अनेक विद्यार्थ्यांनी सुबक व समाजसंदर्भीय भित्तीचित्र व रांगोळया काढून सामाजिक संदेशही दिला.**

# महावाचन अभियानात ग्रंथदिंडीचे आकर्षण !

अभियानानिमित्त पारनेर पब्लिक स्कुलमध्ये उत्साह



पारनेर : प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेचा शालेय शिक्षण क्रिडा विभाग, पंचायत समिती पारनेर यांच्या वतीने पारनेर पब्लिक स्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या महावाचन अभियानात इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी काढलेली ग्रंथदिंडी या अभियानाचे आकर्षण ठरली.**

या अभियानाच्या शुभारंभाप्रसंगी शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी सीमा राणे, विस्तार अधिकारी ढवळे, केंद्रप्रमुख येवले तसेच भुजबळ, आंबेकर, शिरसाट यांच्यासह प्राचार्य गिताराम म्हस्के यावेळी उपस्थित होते.

अभियानाच्या शुभारंभाला पब्लिक स्कुलच्या भव्य प्रांगणामध्ये महावाचन अभियानांतर्गत इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथ दिंडी सोहळयाचे आयोजन केले होते. या सोहळयात स्वतः बरोबर वाचनाच्या संदर्भात महत्व पटवून देणारी सुवचने, धार्मिक ग्रंथ, तसेच आवांतर वाचनाच्या पुस्तकांचा समावेश करण्यात आला होता.

या अभियानानिमित्त प्रांजल गाडे, रिध्दी शिंदे, आदिती थोपटे, गायत्री औटी यांनी पुस्तकांचे वचन केले. कार्यक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुले व मुली, वरखेडमळा शाळेतील विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला. कार्यक्रमाप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. दीपक जाधव यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करून आभार मानले.

### जीवनाचे मुल्य, कष्ट करण्याची जाणीव

**कार्यक्रमाच्या अध्यक्षा गटशिक्षणाधिकारी सीमा राणे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज करताना विद्यार्थ्यांनी वाचन करण्याचे आवाहन केले. कथा, कांदबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या पुस्तकांच्या वाचनाबरोबरच वर्तमानपत्राचे वाचनही विद्यार्थ्यांनी करावे. आज समाजात चांगल्या वाईट कोणत्या गोष्टी घडतात ? त्या का घडतात ? याची माहीती त्यातून आपणास मिळते. वाचनातून आवडीच्या विषयाचे ज्ञान, जीवन जगण्याचे मुल्य, कष्ट करण्याची जाणीव निर्माण होते. त्यासाठी वाचन करण्याचा सल्ला राणे यांनी दिला.**

### विद्यालयाच्या यशावर कळस !

**यावेळी प्रास्ताविक भाषणात प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रचंड यश संपादन केल्याचे सांगितले. पंचायत समितीच्या वतीने महावाचन चळवळीच्या कार्यक्रमाचे आमच्या विद्यालयात आयोजन करून विद्यालयाच्या यशावर कळस चढविण्याची संधी खऱ्या अर्थाने दिल्याचे कृतज्ञतापुर्वक सांगितले.**

# निघोजच्या बोदगे दाम्पत्याला गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

पुणे मनपाकडून शैक्षणिक कार्याची दखल



निघोज : प्रतिनिधी


**पारनेर तालुक्यातील भुमिपुत्र असलेले निघोज येथील बलभीम शिवाजी बोदगे व श्रीमती ललिता चौरे/बोदगे या दाम्पत्याला पुणे महानगरपालिकेमार्फत दिला जाणारा महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सरकारी खाजगी शाळांसाठीचा यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.बोदगे दांपत्याला हा पुरस्कार मिळाल्याने पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.त्यांच्या या यशाचे तालुक्यातील विविध स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.**

पुणे महानगरपालिकेमार्फत दरवर्षी दिला जाणारा महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सरकारी खाजगी शाळांसाठीचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त हे राज्य शासनाप्रमाणे पंचवीस निकषांवर निवडले जाते. त्यामध्ये सेवा काळामध्ये केलेली उत्तुंग कामगिरी विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप ,नवोदय, इंटरमिजिएट, विज्ञान व इतर बाह्य परीक्षांमध्ये योगदान तसेच क्रीडा कला व विज्ञान गणित विषयांमध्ये केलेली भरीव कामगिरी. एनईपी २०२० अन्वये शाळेमध्ये केलेले भरीव योगदान. कोरोना काळामध्ये केलेली ऑनलाइन व्हिडिओ निर्मिती व अध्यापन यांसारखा निकषानुसार १२५ गुणांनुसार जास्त गुण प्राप्त तीस शिक्षकांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली त्यासोबत शिक्षकांचे वर्गातील योगदान प्रत्यक्ष बाहेरील अधिकाऱ्यांकडून तपासणी करून २५ गुणांचे मूल्यमापन केले त्यातून एकूण गुणांनुसार दहा शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो.

बोदगे दाम्पत्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार नीलेश लंके,निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद सर,माजी सरपंच ठकाराम लंके,माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, सरपंच चित्राताई वराळ, पोलिस उपनिरीक्षक महेश लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे, ॲड ज्ञानेश्वर लामखडे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे आदींनी अभिनंदन केले आहे.

# जय मल्हार गणेश मित्र मंडळाच्या वतीने विविध स्पर्धा

■ दैनंदिन आरतीसाठी भाविकांची मोठी गर्दी ■ खंडोबा मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई



निघोज : प्रतिनिधी

**जय मल्हार गणेश मित्र मंडळाचा गणपती उत्सव जोरात असून विविध स्पर्धा घेऊन तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन प्रत्येक दिवशी या मंडळाच्या आरतीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.दरम्यान गणेशोत्सवानिमित्त खंडोबा मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.**

माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांच्या मार्गदर्शनाखाली हे मंडळ कार्यरत आहेत. अनंथा लंके अध्यक्ष तसेच प्रकाश लंके या मंडळाचे उपाध्यक्ष आहेत. जय मल्हार देवस्थान ट्रस्टचे सचिव सचिन लंके व ट्रस्ट पदाधिकारी व सदस्य यांचे सहकार्य या मंडळाला मोठ्या प्रमाणात आहे. मार्गदर्शक बाबाजी आण्णा लंके, पांडुरंग लंके, किसनराव लंके व आबाजी लंके, वरखडे गुरुजी या ज्येष्ठ कारभाऱ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन या मंडळाला मिळत असल्याने मंडळाचा कारभार नावलौकिकास पात्र ठरला आहे.

गेली अनेक वर्षांपासून हे गणेश मंडळ कार्यरत असून धार्मिक व सामाजिक कामांच्या माध्यमातून सेवाभाव करीत या मंडळाने आजपर्यंत अनेक विकासाभिमुख कामांना पाठबळ दिले आहे. खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून निघोज व परिसरातील विकासकामांसाठी माजी सरपंच ठकारामशेठ लंके यांनी प्रयत्न केले असून मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी सातत्याने खासदार लंके यांना पाठबळ दिल्याने या मंडळाच्या प्रत्येक विकासकामांना खासदार लंके यांनी सहकार्य करण्याची भूमिका घेऊन निघोज परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत.

जय मल्हार गणेश मित्र मंडळाने प्रत्येक वर्षी खंडोबा मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करीत जनतेचे लक्ष वेधून घेतले आहे. खंडोबा देवस्थान ट्रस्टने परिसरात सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवीत लंके भावकीचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. खंडोबा मंदिराच्या माध्यमातून कुलदैवताच्या आशिर्वादाने परिसरात आर्थिक सुबत्ता आली असून निघोज व परिसरात धार्मिक संस्कृती मोठ्या प्रमाणात रुजली आहे. या जय मल्हार गणेश मित्र मंडळाच्या वतीने दररोज होत असलेल्या विविध कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांनी केले आहे.

# शारीरिक तंदुरूस्तीसाठी खेळाला महत्व

■ चंद्रकांत चेडे यांचे प्रतिपादन ■ किसान स्कुलमध्ये तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न



पारनेर : प्रतिनिधी

**अभ्यासाबरोबरच आपले शरीर तंदुरूस्त राहण्याची मैदानी खेळ अत्यंत महत्वाचे असून विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध मैदानी खेळांकडे लक्ष देण्याचे आवाहन किसान परिवाराचे अध्यक्ष तथा मा. उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी केले.**

पारनेर शहरातील किसान शैक्षणिक संकुलात तालुकास्तरीय मुलींच्या १४,१७ व १९ वर्षीय वयोगटातील कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या शुभारंभाप्रसंगी चेडे हे बोलत होते.

यावेळी बोलताना चेडे यांनी किसान संकुलात तालुक्याच्या विविध शाळांमधून आलेले खेळाडू तसेच शिक्षकांचे स्वागत केल. मुलींच्या कबडडीच्या स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी तालुका क्रीडा समितीचे आभार मानले. पुढील वर्षी जास्तीत जास्त स्पर्धा किसान संकुलात आयोजित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

यावेळी क्रीडा समितीचे तालुकाध्यक्ष बापूराव होळकर, प्राचार्य राठोर, उंडे, सुदाम दळवी, विनोद गोळे, लतिफ राजे, रांधवन, ऋषीकेश चेडे, मिरा पुजारी यांच्यासह इतर क्रीडा शिक्षण उपस्थित होते.

### राज्यस्तरीय स्पर्धेचा अभास !

**किसान शैक्षणिक संकुलाचा परिसर अतिशय सुंदर असून इथे आल्यानंतर राज्यस्तरीय स्पर्धे चा अभास झाल्याचे गौरवोद्गार तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष बापूसाहेब होळकर यांनी यावेळी काढले. संकुलाचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी यापुढील काळात या संकुलात जास्तीत जास्त स्पर्धांचे आयोजन करण्याचे आवाहन होळकर यांनी केले.**

### किसानच्या वतीने रेफरींना टी शर्ट

**किसान शैक्षणिक संकुलाच्या वतीने पंच म्हणून काम करणाऱ्या क्रीडा शिक्षक रेफरींना टी शर्टचे वितरण करण्यात आले. स्पर्धेदरम्यान संकुलाच्या वतीने विद्यार्थी, शिक्षकांना विविध सुविधाही देण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्या, उपविजेत्या संघांना स्मृतीचिन्हे देण्यात आली. किसानच्या नेटक्या आयोजनाचे उपस्थितांनी कौतुक केले.**

### विजेते संघ

**१४ वर्षे वयोगट पठारवाडी प्रथम, कर्जुलेहर्या द्वितीय, १७ वर्षे पठारवाडी शाळेचे विजेतेपद यंदाही कायम, हंगा शाळा उपविजेती, १९ वर्षे रांजणगांव मशिद प्रथम, ढवळपुरी द्वितीय**

# सुभाष बोरुडे यांचे निधन; सामाजिक व राजकीय नेतृव हरपले

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर शहरातील सामाजिक व राजकीय कार्यकर्तें सुभाष बोरुडे यांचे बुधवार दि. ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७० वर्षे होते.**

सुभाष बोरुडे हे महाराष्ट्र सुतार संघटनेचे प्रदेश अध्यक्ष होते. काँग्रेस पक्षाचे पारनेर तालुका संघटक म्हणून त्यांनी बरेच वर्ष काम केले. त्यांनी नागेश्वर मित्र मंडळाच्या माध्यमातून जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या सामाजिक कार्यातही मोठा सहभाग नोंदवला होता .

ह.भ.प. नाना महाराज वनकुटेकर यांच्या दिंडीत पारनेर ते पंढरपूर दिंडीत मोठे योगदान असत . ग्रामदैवत नागेश्वराच्या महापूजा उत्सवात त्यांचा सहभाग असे.

त्यांच्या मागे पत्नी ,मुलगी, सून व नातवांडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे नागेश्वर मित्र मंडळ व नवयुग मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हळहळ व्यक्त केली.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com